# राशिभविष्य - मार्च , २०१४ .

दादा दामले(dadadamle@gmail.com)

==========================================================

**(१) मेष -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा पूर्वार्धच अधिक अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होण्याची शक्यता आहे. म्हणून नोकरी-व्यापार-व्यवसायात जे काय साधावयाचेे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा प्रयत्न करा. कोणतेही बौद्धिक किंवा साहित्यनिर्मिती क्षेत्र असो, त्यासाठी संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल व लाभदायक होईल. मात्र मन व बुद्धी स्थिर व शांत राखूनच सर्व कार्यवाही झाली पाहिजे. प्रवासाचे योग येतील; पण प्रवासात त्रास होण्याची शक्यता जाणवते. या राशीच्या काही मंडळीना उष्णताविकाराचा तर काहीना हृद्यविकाराचा त्रास होणे संभवते. जीवनसाथीचे अनारोग्य, दोघातील वाद, मतभेद अशापैकी कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. जपा. विशेष करून महिन्याच्या उत्तरार्धात रवि व हर्षल हे दोन्ही ग्रह प्रतिकुल होणार असल्याने असह्य मनस्ताप देणाऱ्या घटना घडतील व त्यामुळे शारीरिक अनारोग्यही होणे शक्य आहे. जपा. श्रद्धा असेल तर श्रीगजानन उपासना आणि शिवोपासना अनुकुलहोईल.

**(२) वृषभ** - मंगळ - शनि हे शत्रु ग्रह आरोग्य स्थानी असल्यामुळे या राशीच्या काही मंडळीना उष्णताविकारांचा, काहींना वातविकारांचा तर काही मंडळीना अपप्रचारामुळे हृदयविकाराचा त्रास होणे शक्य दिसते. चोरी किंवा फसवणूक यामुळे धननाश होणेही शक्य आहे. जपा. या राशीच्या ज्या मंडळीचा परधर्मीयांशी व्यावसायिक संबंध असेल त्यांना अशा संबंधामुळे विविध प्रकारचे लाभ होतील. या राशीच्या नोकरदार मंडळीना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल, पण काहीही कारणाने मित्रांशी वितुष्ट येणार नाही याची काळजी घ्या गुरु ग्रहाच्या अनुकुलतेमुळे कुटुंबात शुभ घटना

घडतील, व्यावसायिक प्रगती व अर्थलाभ होईल. शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेमुळे कला क्षेत्रातील मंडळीनां कीर्ती -प्रसिद्धी मिळू शकेल. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात संततिसुखात बाधा येणे संभवते. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत विविध कारणांनी अडथळे निर्माण होणे संभवते. श्रद्धा असेल तर गुरु दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल. श्रद्धेने " बावन्न श्लोकी गुरुचरित्रा " चे पठणही करा.

**(३) मिथुन -** या राशीच्या मंडळीना कौटुंबिक सुख, संतति सुख आणि गृहसौख्याचे दृष्टीने या महिन्याचा काळ प्रतिकुल असाच असण्याची शक्यता जाणवते. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात तर स्थावर संबंधी वाद, राहत्या जागेबाबतची समस्या अशापैकी कारणांनी असह्य मनस्ताप सहन करावा लागेलसे दिसते. अशा परिस्थितीत मन शांत व बुद्धी स्थिर राखून आणि संयम आणि सहनशील बनून विपरीत काळाशी मुकाबला करणेच सुखाचे होईल. बौद्धिक , शैक्षणिक आणि शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना महिन्याचा उत्त रार्ध अधिक अनुकुल व प्रगतिकारक असल्याचा अनुभव येईल. गुरू-नेपच्यून शुभ योगामुळे अध्यात्मात रस असणाराना उपासानेद्वारे आध्यात्मिक प्ऱगती करणे शक्य होईल. काही मंडळीना सूचक स्वप्ने पडतील. काहीना परदेशगमनाचे योग येतील. शारीरिक आरोग्य उत्तम असले तरी मानसिक अस्वस्थतेमुळे व असह्य मनस्तापामुळे शारीरिक आरोग्यावर परिणाम होणे संभवते. जपा. शुक्र ग्रहा च्या अनुकुलतेमुळे जन्मकुंडलीतील योगानुसार विविध प्रकारचे लाभ होतील. गुरु दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल.

**(४) कर्क -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा काळ मुळीच अनुकुल नसल्यामुळे त्यांनी नवीन काही करण्याचा किंवा आहे त्यात बदल करण्याचा मुळीच प्रयत्न करू नये. मन शांत व बुद्धी स्थिर राखून आणि मनावर संयम ठेवून व सहनशील बनून विपरीत काळ व्यतीत करणेच सुखाचे होईल.

समाजकार्याची आवड असणारांना काळ सुखकारक होईल. आर्थिक व्यवहार फसवणूक होणार नाही याची खात्री करूनच करा. बाकी घरीदारी, नोकरी-व्यवसायात सतत मनस्तापच सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. तुलनात्मक दृष्ट्या महिन्याचा अखेरचा सप्ताह थ◌ोडामनाला उभारी देणारा असेल असे वाटते. भाग्यस्थानी असलेल्या हर्षलमुळे शास्त्रीय संशोधन व गूढ संशोधन कार्यात कार्यरत असणारांना काळ अनुकुल व प्रगतिकारक होईल. तसेच काही मंडळीना दूरच्या प्रवासाचे तर काही मंडळीना परदेशगमनाचे योग येतील. पण इजा होणे, अपघात होणे संभवते. जपा. तसेच जलभय असल्यामुळे जलप्रवास करू नका आणि विषभय असल्याने बाहेरचे खाणे शक्यतो टाळा. श्रद्धा असेल तर श्रीगुरू दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल. दररोज नियमाने “ बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे पठण करा.

**(५) सिंह -** या राशीच्या मंडळीनी या महिन्याच्या काळात सतत सावधानतेनेच आचरण करावे, असे सांगावेसे वाटते. विशेष करून महिन्याच्या उत्तरार्धात रवी ग्रह हर्षलसह या राशीच्या अष्टम स्थानी आल्यावर सतत छोटेमोठे अपघात होण्याची दाट शक्यता आहे. जपा. रवि ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असल्याने ताप येणे, पोटविकार बळावणे, मूत्राशय विकार बळावणे अशापैकी आजार होण्याची शक्यता वाटते. जपा. नोकरीत वरिष्ठाशी मतभेद, भांडणे होण्याची शक्यता दिसते. जपा. तसेच जीवनसाथीच्या अनारोग्यामुळे किंवा दोघात मतभेद होत असल्याने सतत वाद, भांडणे झाल्यास वैवाहिक जीवनातील सुखसमाधान मिळणे अशक्य होईल. या राशीच्या काही मंडळीना जीवनसाथीच्या अनारोग्यासह संततीच्या अनारोग्याकडेही लक्ष द्यावे लागेल. मंगळ - शनि- राहू यांत शुभ योग असल्यामुळे वकिली, सल्लागारी व्यवसाय, यांत्रिकतांत्रिक व्यवसाय, शिक्षण व्यवसाय, चिकित्सक बौद्धिक व्यवसाय असणारांना काळ अनुकुल व लाभदायक होईल. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात आर्थिक समस्या व व

उष्णताविकार बळावून अनारोग्य होणे संभवते. तसेच काहीही कारणाने बंधुसुखात बाधा येणे संभवते. जपा. श्रद्धा असेल तर श्रीगणेश वा श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल. हनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा.

**(६) कन्या -** शनी - मंगळ - राहू हे तीन ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असल्यामुळे या राशीच्या मंडळीनी या महिन्याच्या काळात अकारण मनस्ताप करून न घेता धीराने व विचारपूर्वक आचरण करून प्रतिकुल काळाशी मुकाबला केला पाहिजे. काल्पनिक चिंता करू नका. कसल्याही प्रकारची फसवणूक होणार नाही याची काळजी घ्या. तरच शारीरिक-मानसिक आरोग्य फारसे बिघडणार नाही. आर्थिक समस्या त्रस्त करतील. त्यामुळे व अन्य कारणांनी कौटुंबिक जीवनात वाद, कलह, अनिष्ट घटना घडू शकतील. जपा. नोकरदार मंडळीना महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल व प्रगतिकारक असल्याचा अनुभव येईल. अपेक्षित संततीसुख लाभण्याची शक्यता कमी आहे. जीव्नसाथीच्या लहरी व विक्षिप्त आचरणामुळे वाद, भांडणे होणे संभवते. त्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखातही बाधा येणे शक्य दिसते. शिक्षण क्षेत्र , कोणतेही बौद्धिक क्षेत्र , शास्त्रीय संशोधन क्षेत्र असणारांना काळ अधिक अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. श्रद्धेने हनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा.

**(७) तुळा -** या महिन्याच्या काळात या राशीच्या मंडळीचा स्वभाव हटटी, हेकट असा झाला असण्याची शक्यता वाटते. त्यामुळे अकारण दगदग, श्रम , शरीरपीडा होणे संभवते. तसेच मनस्ताप देणाऱ्या घटना घडणे संभवते. त्यामुळे गहरे नैराश्य येणे शक्य आहे. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात तर विविध कारणांनी असह्य मनस्ताप देणाऱ्या घटना घडून अस्वस्थ वाटेल. जपा. बुध-शुक्राच्या अनुकुलतेमुळे गृहसौख्य व मित्रसुख लाभेल शेतीवाडी असणारांना काळ लाभदायक होईल. काही भाग्यवान मंडळीना धनलाभ होणेही संभवते. अध्यात्म व गूढ संशोधन कार्यात रस असणारांना काळ अनुकुल होईल. या राशीच्या

विद्यार्थ्यांना उत्तम आरोग्य राखता आले तरच शैक्षणिक प्रगती करणे शक्य होईल. अति विचार करू नका. नपेक्षा डोकेदुखी, मेंदूचा आजार होणे शक्य आहे. जपा. नोकरदार व स्वतंत्र व्यापार व्यवसाय असणारांना महिन्याचा उत्तरार्धचअधिक अनुकुल व लाभदायक होईल. विविध कारणांनी अपेक्षित वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. श्रद्धा असेल तर गुरुदेव दत्तात्रेयाची उपासना व हनुमान उपासना अनुकुल होईल.

**(८) वृश्चिक -** सर्व प्रकारचे आरोग्य उत्तम राखावयाचे असेल तर या राशीच्या मंडळीनी सतत मनावर संयम ठेवून, जिभेवर ताबा ठेवून सहनशीलतेचे ेआचरण केले पाहिजे. तसेच सर्व आर्थिक व्यवहार फसवणूक होणार नाही याची काळजी घेत सावधानतेने केले पाहिजेत. काही जुनी दबलेली प्रकरणे असतील तर त्यांचा पुन्हा त्रास होणे संभवते. जपा. कौटुंबिक वाद, भांडणे यांमुळे कौटुंबिक सुख व गृहसौख्य लाभणे अशक्य होईल. नियोजित कार्ृयातदिरंगाई होणे, अनपेक्षित खर्च उपटणे अशापैकी समस्या त्रस्त करतील. अशा प्रतिकुल परिस्थिती तही गुरु-शुक्र या शुभ ग्रहांच्या अनुकुलतेने मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व थोडा दिलासा मिळेल. ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभाचे योग आहेत अशापैकी काहीना तसा धनलाभ होणेही संभवते. ज्यांचे चिकित्सक बौद्धिक व कलात्मक कार्यक्षेत्र आहे अशांना काळ अनुकुल, ्प्रगतिकारक व लाभदायक होईल. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात मैत्रीत वितुष्ट येणे संभवते. जपा. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना अनुकूल होईल.

**(९) धनु -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा पूर्वार्धच अधिक अनुकुल व लाभदायक होईल. कौटुंबिक सुख समाधान लाभेल. कुटुंबात शुभ घटना घडतील. आर्थिक लाभ होतील. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना बढती, उच्च पद, मानाचे स्थान असे काही मिळण्याची शक्यता दिसते. मात्र वाममार्ग धन सहज मिळणे शक्य असले तरी तो मोह टाळाच. अध्यात्म , गूढ विद्या अशा

विषयात रस असणारांना उपासनेद्वारा किंवा संशोधनद्वारा प्रगती व यश साधणे शक्य होईल. चिकित्सक बौद्धिक व्यवसाय, कोळसा, लोखंड व्यापारी यांना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल व लाभदायक होईल. सामान्य नोकरदार मंडळीना मात्र कष्ट परिश्रम करूनच अपेक्षित अर्थप्राप्ती करून घ्यावी लागेल. या राशीच्या काही मंडळीना जलप्रवासाचे तर काहीना परदेशगमनाचेयोग संभवतात. महिन्याच्या उत्तरार्धात रवि-हर्षल युतीमुळे गृहसौख्यात व कौटुंबिक सुखात बाधा येणे शक्य दिसते. गुरु ग्रहा च्या अनुकुलतेने विवाहेचछू वधुवरांचे विवाह ठरतील. नवे स्नेहसंबंध जुळतील. श्रद्धेने बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे पठण करा.

**(१०) मकर -** या राशीच्या मंडळीना या महिन्याच्या पूर्वार्धात काहीही कारणाने कौटुंबिक सुखात बाधा येणे संभवते. तसेच आर्थिक प्रश्न त्रस्त करतील. काहीना डोळ्याची दुखणी सतावतील. विशेष करून दिनांक २-३ आणि २४-२५ हे चार दिवस अविस्मरणीय फलदायी जातीलसे दिसते. केतूमुळे कोणाशीही पटणार नाही व त्यामुळे गृहसौख्यात बाधा येणे संभवते. जपा. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना महिन्याचा उत्तरार्ध लाभदायक होईल. बढती, पगारवाढ, मानाचे पद असे काही मिळेलसे वाटते. उच्च बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना, यांत्रिक तांत्रिक व्यवसाय असणारांना, औषध विक्रेत्या ना लोखंड, कोळसा विक्रेत्यांना काळ अनुकुल व लाभदायक होईल. या राशीच्या काही मंडळीना परदेशगमनाची संधी मिळेल. पण महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात शक्यतो प्रवास करू नका. मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. श्रद्धेने हनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा.

**(११) कुंभ -** सध्या या राशीच्या मंडळीचे मन अत्यंत कोमल व भावनाशील झाले असण्याची शक्यता वाटते. शीघ्र मानसिक संवेदना होत असल्यास काही मनाविरुद्ध घडले तर लगेच नैराश्य येत असावे, असे वाटते. नियोजित कार्यात

अडथळे येणे, आर्थिक चिंता व आर्थिक फसवणूक झाल्यास होणारा मनस्ताप असह्य होऊन शारीरिक आरोग्यही बिघडत असावे, असे वाटते. अशा परिस्थितीत हृदयविकार, रक्तदाब असे आजार असणारांनी तर मनावर संयम ठेवून व सहनशील बनूनच आचरण केले पाहिजे. घरात वाद, भांडणे होणार नाहीत याकडे लक्ष दिले पाहिजे. स्वभाव अस्थिर, चंचल झाल्यास जिभेला लगाम घालून व मूक व्रत चालवून आचरण केल्यास खूपच सुखाचे होईल. त्यासाठी आध्यात्मिक उपासनेचा अवलंब करा. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकुल होईल. दूरच्या प्रवासाचे योग सभवतात; पण प्रवासात मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची शक्यता दिसते. जपा. गुरु-शुक्राच्या अनुकूलतेमुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल.

**(१२) मीन -** या राशीच्या मंडळीचा स्वभाव सध्या खूप अस्थिर, चंचल व लहरी झाला असावा, असे वाटते. तसे असेल तर कोणी काही सांगितले वा सुचविले तरी लगेच अपमान झाल्यासारखे वाटत असावे असे वाटते. या राशीची लहान मुले सध्या अधिक हूड व व्रात्य होण्याची शक्यताही नाकारता येत नाही. तसा अनुभव आल्यास मुलांना जपा. रवि ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असल्यामुळे या राशीच्या नोकरदार मंडळीना नोकरीचे ठिकाणी त्रास सहन करावा लागेलसे दिसते. त्यामुळे शारीरिक अनारोग्य होणेही शक्य आहे. जपा. आर्थिक चिंता त्रस्त करतील. त्यामुळे शारीरिक - मानसिक कष्ट होतील. काहीना उष्णताविकाराचा त्रास सहन करावा लागेल. काहीना महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात वैवाहिक जीवनातील सुखात काहीही कारणाने बाधा येणे शक्य आहे. जपा. गुरु -शुक्राच्या अनुकुलतेने मधून मधून मनोनुकुल घटना घडतील. श्रद्धा असेल तर “ बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे “ व “ हनुमानचालिसा स्तोत्राच “ पठण करा.

=====ooooo=====